मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी नव्याने आरक्षण सोडतीचा कार्यक्रम

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र. ०४ /का-८,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २२/०७/२०२२.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
(मुंबई व मुंबई शहर वगळून) .

विषय - **ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक - नव्याने आरक्षण सोडतीचा कार्यक्रम**
संदर्भ - राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकांचे दि. २४/११/२०२१, दि.२६/११/२०२१, दि. २९/१२/२०२१, दि. २७/०१/२०२२, दि.०६/०५/२०२२, दि. ३०/०५/२०२२ व दि. ०३/०६/२०२२ चे प्रभाग रचना व आरक्षण सोडत कार्यक्रमाचे आदेश

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतींच्या मुदत संपण्यापूर्वी निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

आयोगाच्या दिनांक २७/०१/२०२२ च्या आदेशान्वये **माहे जानेवारी २०२१ ते नोव्हेंबर २०२१ मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १८४९ ग्रामपंचायती , माहे डिसेंबर २०२१ ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या सुमारे ६७४७ ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायती, आयोगाने प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेला कार्यक्रम चुकीच्या पध्दतीने राबविल्यामुळे सर्व निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या** ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभागाच्या सीमा निश्चित करण्यासाठी कार्यक्रम देण्यात आला होता. या कार्यक्रमानुसार दिनांक २५/०३/२०२२ पर्यंत मा. जिल्हाधिकारी यांनी अंतिम मान्यता देऊन दिनांक २९/०३/२०२२ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात येणार होती.

ग्रामविकास विभागाने सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२२ दिनांक ११/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० मध्ये केलेल्या सुधारणेमुळे आयोगाच्या दिनांक ४/०३/२०२२ च्या पत्रान्वये सदर प्रभाग रचना व आरक्षणाचा कार्यक्रम सुनावणीच्या टप्प्यावर स्थगित करण्यात आला.

मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये दिनांक ०४/०५/२०२२ रोजीच्या अंतरिम आदेशामध्ये दिनांक १०/०३/२०२२ रोजीच्या टप्प्यापासून पुढील प्रक्रिया करण्याचे आदेश दिले असून या आदेशानुसार आयोगाने दिनांक २७/०१/२०२२ रोजी दिलेल्या कार्यक्रमानुसार प्राप्त हरकती विचारात घेऊन आयोगाच्या दिनांक ०६/०५/२०२२ च्या आदेशानुसार सुनावणीच्या पुढील टप्प्यापासून प्रभाग रचनेचा कार्यक्रम देण्यात आला होता.

या कार्यक्रमानुसार माहे जानेवारी २०२१ ते एप्रिल २०२२ मध्ये मुदत संपलेल्या, माहे मे २०२२ ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या, नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायती तसेच मागील निवडणूकीत संपूर्ण निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या ग्रामपंचायती अशा एकुण १७३२ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता प्रभागांच्या सीमा निश्चित करुन दिनांक २७/०५/२०२२ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आली तसेच या ग्रामपंचायतींसाठी दिनांक ०३/०६/२०२२ रोजी देण्यात आलेल्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रम नुसार दिनांक २१/०६/२०२२ रोजी आरक्षणासहित १७०१ ग्रामपंचायतींची अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३/२०२१, दि. २३/०९/२०२१ चे सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१९, दिनांक ०१/०२/२०२२ अन्वये अधिनियमात रुपांतर करण्यात आले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयामधील विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ मध्ये दि. १२ जुलै, २०२२ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करण्याकरिता गठीत केलेल्या समर्पित मागासवर्ग आयोगाने आवश्यक त्या बाबींची पूर्तता करुन दि. ७ जुलै, २०२२ रोजी आपला अहवाल शासनास सादर केल्याची बाब शासनाने अर्ज क्र. ९२६९५/२०२२ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २० जुलै, २०२२ रोजीच्या सुनावणीत राज्य निवडणूक आयोगाने यापुढील निवडणुकांमध्ये समर्पित मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन पुढील निवडणुका घेण्याबाबत आदेश दिले आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २० जुलै, २०२२ रोजी दिलेल्या उपरोक्त आदेशास अनुसरुन ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवण्याच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे.

दिनांक २१/०६/२०२२ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द केलेल्या ग्रामपंचायतीपैकी माहे जानेवारी २०२१ ते माहे सप्टेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या १५ जिल्हयातील २७१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी निवडणूक कार्यक्रम देण्यात आला आहे. या कार्यक्रमानुसार नामनिर्देशनाची प्रक्रिया पूर्ण झाली असून दिनांक ०४/०८/२०२२ प्रत्यक्ष मतदान होणार आहे.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ ) मधील कलम १० अ पोटकलम (४) नुसार मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करुन प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम सुरु असलेलया २७१ ग्रामपंचायती वगळून उर्वरित सुमारे ९४३० ग्रामपंचायतीतील सदस्य संख्या विचारात घेऊन प्रत्येक ग्रामपंचायतीच्या सदस्य संख्येनुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम राबविण्यासाठी आदेशित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. ग्रामपंचायतींच्या सर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असल्याने, त्यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेऊन निवडणुका योग्यप्रकारे पार पाडाव्यात.

२. समर्पित मागासवर्ग आयोगाच्या शिफारशीनुसार प्रत्येक ग्रामपंचायतीला त्याच्या एकूण जागांपैकी नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता शिफारस केलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता देय होतील. मात्र महाराष्ट्र अधिनियम क्र. १९/२०२२, दिनांक ०१/०२/२०२२ नुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग चे एकूण आरक्षण हे पंचायतीमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही. ”

३. आयोगाने दिनांक ३०/०५/२०२२ व दिनांक ०३/०६/२०२२ रोजी दिलेल्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमानुसार दिनांक २१/०६/२०२२ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द केलेल्या ग्रामपंचायतीतील सदस्य संख्या विचारात घेऊन प्रत्येक ग्रामपंचायतीच्या सदस्य संख्येनुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी राखीव ठेवावयाच्या जागांची परिगणना करण्यात यावी.

४. ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण ) आदेश २०२१, दिनांक २४/११/२०२१ मध्ये प्रभाग रचना व आरक्षण करण्याची सविस्तर कार्यपध्दती नमूद केलेली आहे. नागरिकांच्या मागसवर्ग प्रवर्गाच्या जागा निश्चित करण्यासाठी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण ) सुधारणा आदेश २०२२ दिनांक २२/०७/२०२२ अन्वये कार्यपध्दती नमूद केलेली आहे.

५. उक्त आदेशानुसार आरक्षणाची सोडत काढण्याची प्रक्रिया राबविण्यात यावी.

६. आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** नुसार पार पाडण्यात यावा.

७. दिनांक २४/११/२०२१ च्या आदेशातील मुद्दा क्र. ९ नुसार पंचायतीच्या एकूण जागांच्या ५० % जागा महिलांकरीता आरक्षित ठेवणे आवश्यक आहे.

८. आयोगाच्या दि. २४/११/२०२१ च्या आदेशासोबतचे परिशिष्ट ६ अ (बिगर अनुसूचित/ अंशतः अनुसूचित क्षेत्रासाठी) मध्ये यासोबत जोडलेल्या परिशिष्ट १ नुसार अंशतः सुधारणा करण्यात येत आहे. **या मूळ आदेशातील परिशिष्ट ६ ब ( संपुर्णतः अनुसूचित क्षेत्रासाठी) मधील अ.क्र. ७ नुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी एकही जागा आरक्षित होणार नाही. तसेच या** आदेशातील परिशिष्ट ११ नुसार ग्रामपंचायत आरक्षणाचे संपूर्ण विवरणपत्र तयार करण्यात यावे. परिशिष्ट १३ नुसार प्रारुप प्रभाग रचना व परिशिष्ट १६ नुसार अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात यावी.

९. प्रारुप अधिसूचना व अनुसूची यास व्यापक प्रसिध्दी देण्याची जबाबदारी सबंधित तहसिलदार यांची असेल.

१०. विशेष ग्रामसभेत आरक्षण सोडतीअंती आरक्षणावर हरकती व सूचना मागविण्यात याव्यात. प्राप्त हरकती विचारात घेऊन उपविभागीय अधिकारी यांनी अभिप्राय द्यावेत. उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन जिल्हाधिकारी यांनी **अंतिम** अधिसूचनेस मान्यता द्यावी.

११. अंतिम अधिसूचना व अनुसूची यास व्यापक प्रसिध्दी देण्याची जबाबदारी सबंधित तहसिलदार यांची असेल.

१२. उक्त कार्यक्रमानुसार प्रत्येक टप्प्यावरील अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करावा.

उक्त सर्व आदेशातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार तसेच इतर संबंधितांनी घ्यावी.

१३. सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** नुसार प्रभागाच्या आरक्षणाचा कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**सहपत्र - परिशिष्ट अ**

**प्रती -**

१. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन.

**उक्त** कालावधीतील ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसंदर्भात **अनुदानाची पर्याप्त तरतूद (मागील अनुदानाच्या थकबाकीसह) करण्याबाबत आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी. तसेच** या पत्रात निर्देश दिल्यानुसार ग्रामसेवकासह **संबंधित गटविकास अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.) जिल्हा परिषद यांची सक्रिय भूमिका व जबाबदारी राहील, याबाबतचे निर्देश देणारे पत्र आपणाकडून तातडीने निर्गमित करण्यात यावे.**

२. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

३. विभागीय आयुक्त (सर्व),

४. जिल्हाधिकारी **सर्व (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)**

५. **मुख्य कार्यकारी अधिकारी,** जिल्हापरिषद (सर्व)

६. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

७. सर्व निवडणूक कार्यासने

८. निवड नस्ती.

आयोगाचे क्रमांक - रानिआ/ग्रापंनि २०२०/प्र.क्र. ४ /का.०८, दि. २२/०७/२०२२ रोजीच्या आदेशासोबतचे सहपत्र

## परिशिष्ट अ

## ग्रामपंचायत आरक्षण सोडतीचा सुधारीत कार्यक्रम

| आरक्षणाची सोडत | कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|
| i) विशेष ग्रामसभेची सूचना देणे ( आरक्षणाची सोडत काढण्याकरीता ) | २६/०७/२०२२ |
| ii) विशेष ग्रामसभा बोलवून, तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली,प्रारुप प्रभाग रचनेवर आरक्षणाची सोडत काढणे (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग , नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला) | २९/०७/२०२२ |
| iii) सोडतीनंतर प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करणे | ०१/०८/२०२२ |
| iv) प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | ०१/०८/२०२२ ते ०३/०८/२०२२ |
| v) उपविभागीय अधिकारी यांनी प्राप्त हरकती विचारात घेऊन अभिप्राय देणे | १०/०८/२०२२ |
| vi) उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन अंतिम अधिसूचनेस (नमुना अ) जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे | १२/०८/२०२२ |
| vii) जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला (नमुना अ) व्यापक प्रसिध्दी देणे | १७/०८/२०२२ |

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र